# गरीब मुलांसाठी झटणारं दाम्पत्य

**रस्त्यालगत, झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या मुलांना आपलं बालपण खऱ्या अर्थानं अनुभवता यावं आणि भविष्याची स्वप्नं पाहण्यासाठी पंखही मिळावेत, यासाठी नवी दिल्लीतील अरोरा दाम्पत्य कार्यरत आहे.**




एकला चलो रे

**शीतल गवस**

sheetal.gawas@mimarathilive.in


रस्त्याने येता-जाताना आपण अनेक गरीब मुलांना भीक मागताना पाहतो. कधी त्यांना पैसे देतो, कधी खाऊ देतो, तर कधी नुसतीच हळहळ व्यक्त करून पुढे जातो. आपल्या दैनंदिन आयुष्यात व्यग्र होतो. नवी दिल्लीतील कुकू अरोरा हेही आपल्यासारखेच. पण अरोरा यांचा दृष्टिकोन बदलला रोशनीमुळे.

कुकू अरोरा हे कपड्यांचे व्यापारी. स्वतःच्या वर्कशॉपमध्ये पोशाख डिझाइन करून ते निर्यात करणं हा त्यांचा व्यवसाय. त्यासाठी त्यांनी २००२मध्ये नवी दिल्लीतरी सैदुलाजाब या भागात एक जागा भाडेतत्त्वावर घेतली. साधारण दोन वर्षांची एक मुलगी त्यांना या वर्कशॉपबाहेर नेहमी दिसे. त्यांचा मुलगा कबीरही याच वयाचा होता. त्या मुलीला एकच हात होता, त्यामुळे त्यांना तिच्याविषयी अधिकच आत्मीयता वाटे. त्यातून कुकू आणि त्यांची पत्नी प्रीती या मुलीसाठी, रोशनीसाठी खाण्याचे पदार्थ आणू लागले. या खाऊच्या आमिषाने रोशनीही रोज अरोरा यांच्या ऑफिसजवळ फिरकायची, पण काही दिवसांनी ती दिसेनाशी झाली. अस्वस्थ झालेल्या अरोरा दाम्पत्यांनी तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती जवळच्याच एका रहदारी असलेल्या रस्त्यावर भीक मागताना आढळली.

जेमतेम दोन वर्षांची ही मुलगी भीक मागतेय, हे पाहून या दाम्पत्याला खूप वाईट वाटलं आणि या मुलीसाठी आपण काहीतरी करावं, हे त्यांनी ठरवलं. त्यांनी रोशनीच्या आईवडिलांविषयी चौकशी केली. ते त्यांना जाऊनही भेटले. रोशनीला शाळेत दाखल करण्यासाठी तिच्या आईवडिलांना समजवण्याचा खूप प्रयत्न केला, रोशनीच्या शिक्षणाचा सर्व खर्च उचलण्याचीही तयारी दाखवली, पण ते काही तयार होईनात. शेवटी रोशनीच्या मोठ्या भावाच्या शिक्षणाचीही जबाबदारी घ्यायच्या अटीवर ते रोशनीला शाळेत दाखल करायला तयार झाले.

रोशनी आणि तिच्या भावाच्या शिक्षणाची जबाबदारी अरोरा कुटुंबीयांनी घेतली, ही बातमी त्या परिसरात पसरली आणि दुसऱ्याच दिवशी आणखी पंधरा मुलं अरोरा यांच्या दारावर हजर झाली. "आम्हालाही शाळेत जायचंय, हा त्या लहानग्यांचा बालहट्ट न पुरवून चालणारच नव्हतं. तो त्यांचा हक्कच होता. तो आपण त्या मुलांना मिळवून द्यायचा असं आम्ही मनोमन ठरवलं," प्रीती अरोरा सांगतात, तर कुकू अरोरा म्हणतात, "नक्की काय करणार, कसं करणार, आम्हाला स्वतःलाही काहीच माहीत नव्हतं, पण या मुलांसाठी आपण काही तरी करायचंच, हे ठरलं होतं."

अरोरा यांनी आपल्या ऑफिसमधील अर्धी जागा या मुलांसाठी राखून ठेवली आहे. या मुलांना केवळ शाळेत पाठवणं एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर या मुलांचं जीवनमान उंचवावं यासाठी त्यांचा दिवसभर सांभाळ करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. ही मुलं सकाळी उठल्याबरोबरच अरोरा यांच्या वर्कशॉपमध्ये येऊ लागली. मग या मुलांची आंघोळ, दात घासणं, चहा-नाश्ता, शाळेसाठीची तयारी, शाळेत पोहचवणं-परत घेऊन येणं, दुपारी झोपणं, अभ्यास घेणं, दोन वेळचं जेवण, खेळणं, टीव्ही पाहणं असं सर्वच अरोरा यांच्या वर्कशॉपमध्ये होऊ लागलं.



मुलांना हे सर्व काही आवडणारं होतं, पण सुरुवातीला त्यांच्या पालकांचा सूर तितका सकारात्मक नव्हता. याविषयी कुकू सांगतात, "त्यांचे पालक वाईट होते, असं नाही. पण दैनंदिन जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, त्यांची गरिबी आणि त्यातून केलं जाणारं मद्यपान... थोडक्यात परिस्थितीच त्यांच्या बाजूने नव्हती, तेव्हा ते आपल्या मुलांच्या बाजूने असतील अशी अपेक्षा करणंही योग्य नाही. शिवाय बऱ्याच पालकांसाठी ही मुलं म्हणजे पैसा मिळवण्याचं साधन होती. त्यामुळे आम्ही शाळेची फी भरत असलो तरी, त्या मुलांना भीक मागायला किंवा इतर कामाला न जुंपता शाळेत पाठवणं त्यांना परवडणारं नव्हतं." पण अरोरा दाम्पत्यांनी काही हार मानली नाही. या मुलांचं शिक्षणाचं स्वप्न पूर्ण करायचंच या निश्चयाने त्यांनी या पालकांना हरप्रकारे गळ घातली. अगदी विनंतीपासून पोलिसांच्या धमकीपर्यंत शक्य ते सर्व उपाय त्यांनी केले. पुढे अरोरा यांच्याकडे येणाऱ्या मुलांची प्रगती पाहून इतर पालक स्वतःहून आपल्या मुलांना त्यांच्याकडे आणू लागले. अरोरा सुरुवातीला या मुलांना सरकारी शाळांमध्ये दाखल करतात, पुढे त्यांच्या गुणवत्तेनुसार त्यांना खाजगी शाळांमध्ये पाठवलं जातं. प्रत्येक मुलाला सर्वोत्तम आयुष्य जगण्याची योग्य संधी मिळावी, यासाठी ते प्रयत्न करत आहेत.

या मुलांसाठी वर्कशॉपमधील जागा कमी पडू लागली म्हणून त्यांनी या इमारतीत आणखी दोन मजले भाडेतत्त्वावर घेतले. आपल्या या वर्कशॉपचा वरचा मजला आणि गच्ची त्यांनी या मुलांसाठी भाडेतत्त्वावर घेतली आहे. आज या ठिकाणी चार ते एकवीस वर्षं वयोगटातील १९० मुलं आपलं हक्काचं बालपण अनुभवत आहेत. या मुलांच्या सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणपर्यंत, शाळेचा गणवेश, बूट, वह्या-पुस्तकं, खेळ, मनोरंजन, वैद्यकीय देखभाल अशा सर्वच गोष्टींची



जबाबदारी या अरोरा कुटुंबीयांनी उचलली आहे. याविषयी ते म्हणतात, "दिवसभर आमच्याकडे राहून ही मुलं रात्री झोपायला आपापल्या घरी जातात. दिवसभर ही मुलं आमच्याकडेच असतात, तेव्हा त्यांच्या रात्रीच्या झोपण्याची सोयही इथे करणं काही कठीण नव्हतं, पण त्यांचे त्यांच्या कुटुंबीयांशी बंध घट्ट तुटू नयेत, घट्ट राहावेत, हाच विचार यामागे आहे." दिवसभर या मुलांची देखभाल करायला सात कर्मचारीही त्यांच्याकडे आहेत. शिवाय अरोरा दाम्पत्य त्यांचा आहार, शिक्षण यावर स्वतः लक्ष ठेवतं.

या मुलांच्या पालकांशीही त्यांचे चांगले संबंध आहेत. ही पालक मंडळी अनेकदा अडीअडचणीत अरोरांकडे मदत मागतात आणि अरोरा त्यांना शक्य ती मदत करतात. अरोरा यांनी चाळीसेक पालकांना आपल्या ओळखीने कामही मिळवून दिलं आहे. त्यातील काही जण तर अरोरा यांचेच या कर्मचारी बनले आहेत.

व्यावसायिक असले, तरी अरोरा यांना या सर्व मुलांची दर महिन्याची शाळेची फी, वह्या-पुस्तकं, वैद्यकीय खर्च हा खर्च भागवणं काही सोपं नव्हतं. अनेक वेळा, 'आता यापुढे अजून काही करणं शक्य नाही,' असं त्यांच्या मनात आलंही, पण प्रत्येक वेळी काही ना काही सकारात्मक घडत राहिलं. असाच एक किस्सा कुकू सांगतात, "नेपाळहून आलेल्या एका लहान मुलीला फळ्यावर लिहिलेलं दिसायचं नाही. त्याचा परिणाम तिच्या अभ्यासावर होत होता. डॉक्टरांनी तिच्यासाठी चष्मा बनवून घ्यायला सांगितलं. मी लगेच तो बनवायलाही दिला, पण त्यासाठीचे दोन हजार रुपये माझ्या खिशात नव्हते. आपण या मुलांची एवढी साधी गरजही पूर्ण करू शकत नाही, या विचाराने निराशा आली होती. निराशेने मी हे काम बंद करण्याच्या विचारापर्यंत आलो होतो, पण नातेवाईकांकडून ते पैसे मिळाले आणि चष्मा विकत घेतला. दुसऱ्याच दिवशी ती मुलगी भेटली. चष्मा लावून ती आनंदून मला म्हणाली, पहिल्यांदा मी तुम्हाला स्पष्ट पाहतेय, तुम्ही खूप छान दिसता. हे ऐकून अंगात नवा उत्साह संचारला." वेळोवेळी घडणाऱ्या या घटना हे काम अविरत सुरू ठेवण्याची प्रेरणा त्यांना देतात.

अरोरा यांच्यामुळे या मुलांचं आयुष्यच बदलून गेलं आहे. शिक्षणाने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला आहे. ही मुलं भविष्याची स्वप्नं पाहू लागली आहेत आणि त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करू लागली आहेत. एके काळी मुलगी आहे म्हणून जिला वडिलांनी शिक्षणापासून वंचित ठेवलं होतं, ती फिरदोस मलिक आज नवी दिल्लीतील एका प्रतिष्ठित शाळेत शिकतेय, ती दरवर्षी प्रथम क्रमांक आणतेय. डॉक्टर किंवा वकील व्हायचं तिचं स्वप्न आहे. नववी शिकणारा मंजित शालांत राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धांमध्ये पहिला आला आहे, तर सलीम गेली चार वर्षं सरकारी शाळांमधील योगाभ्यासात पहिला येत आहे. ही सर्व मुलं अस्खलित इंग्रजी बोलतात. काही तर जर्मन भाषाही शिकली आहेत. शिक्षण पूर्ण केलेली काही मुलं चांगल्या कंपन्यांमध्ये उच्चपदावर काम करत आहेत, तर काही मुलांचं शिक्षण पूर्ण झालं असलं तरी त्यांच्याबरोबरच काम करत आहेत.

चार वर्षांपूर्वी अरोरा यांनी या प्रोजेक्टसाठी 'सनशाइन' ही स्वयंसेवी संस्था स्थापन केली आहे. आर्थिक बाजू आजही तेवढी भक्कम नसली, तरी संस्थेला मिळणाऱ्या निधीतून या मुलांचं बालपण आणि भविष्यही उजळवण्याचा प्रयत्न आहे. या मुलांना शक्य त्या सर्व सुविधांसोबतच भावनिक आधार देण्यावरही या दाम्पत्याचा भर आहे. हे काम यापुढेही असंच सुरू राहावं, यासाठी ते आपल्याकडील प्रत्येक मुलाकडून असं वचन घेतात की, तीही भविष्यात अशा प्रकारे दोन मुलांची जबाबदारी घेतील आणि मुलंही त्यांचं वचन पूर्ण केल्यागत हे काम करत आहेत.